कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२१-२२/२००९
दि.२/१२/ २०२१

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीची ५४ वी मराठी 'अ' गट नाट्यस्पर्धा दि.९ डिसेंबर २०२१ पासून सुरू होत असून यंदाच्या स्पर्धेत एकूण ८ नाट्यसंस्था सहभागी झाल्या आहेत. ही स्पर्धा रविंद्र भवन, साखळी यांच्या सहकार्याने पं. मनोहरबुवा शिरगांवकर नाटयगृहात, रोज सायं. ७.०० वाजल्यापासून दि. २० डिसेंबर २०२१ पर्यंत चालणार आहे. शासनाने घालून दिलेली कोविड-१९ च्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन या स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे.

स्पर्धेच्या पुर्वनियोजित कार्यक्रमानुसार दि.७ डिसेंबर २०२१ रोजी **हंस संगीत नाटय मंडळ, वारखंडे-फोंडा** या संस्थेच्या कौस्तुभ नाईक लिखित "**हत्ती मातला**" हा नाटयप्रयोग सदर संस्थेने मागे घेतल्यामुळे स्पर्धेत सादर होणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

त्यामुळे यंदाच्या मराठी 'अ' गट नाटयस्पर्धेचा प्रारंभ दि. ९ डिसेंबर रोजी **रुद्रेश्वर, पणजी** यांनी सादर केलेल्या प्रसाद प्रेमानंद कळंगुटकर लिखित "**आसन. एन केन**" या नाटकाने होणार आहे. त्यानंतर **अथश्री, फोंडा** या संस्थेच्या वतीने डॉ. स्मिता जांभळे व आदित्य जांभळे लिखित "**सौ.**" हे नाटक दि.१० डिसेंबर रोजी होईल. अधीर भट यांच्या लेखणीतून साकार झालेल्या व सौरभ कारखानीस यांनी अनुवादित केलेले "**द ट्रायल**" हे नाटक दि.१३ डिसेंबर रोजी **राजहंस क्लब, पणजी-गोवा** ही संस्था सादर करेल तर दि. १४ डिसेंबर रोजी विजयकुमार नाईक यांनी लिहिलेल्या "**पालशेतची विहीर**" या नाटकाचा प्रयोग **विजयकुमार्स ट्रॅव्हलींग बॉक्स थिएटर, वारखंडे-फोंडा** ही संस्था सादर करणार आहे.

दि.१५ डिसेंबर रोजी तनवीर खान यांच्या लेखणीतून साकार झालेले व वर्धन कामत यांनी अनुवादित केलेले "**फक्त चोवीस तास**" हे नाटक **श्री नागेश महालक्ष्मी प्रासादिक नाटयसमाज, बांदिवडे-फोंडा** ही संस्था सादर करणार आहे. दि.१६ डिसेंबर रोजी मारियो बेनेडेट्टी यांच्या लेखणीतून उतरलेल्या "**पेद्रो आणि कॅप्टन**" या नाटकाचा प्रयोग **मंगलमूर्ती कलाबहार, भिरोंडा-सत्तरी** ही संस्था सादर करणार असून हे नाटक नारायण आशा आनंद यांनी अनुवादित केलेले आहे. **दुर्वा थिएटर्स, करमळी-तिसवाडी** ही संस्था गोविंद मोकाशी लिखित "**प्रश्न तुमच्या निर्णयाचा**" हे नाटक दि.१७ डिसेंबर रोजी सादर करेल. तर दि.२० डिसेंबर रोजी स्पर्धेचा समारोप **श्री हनुमान सेवा समिती, बांबर, वाळपई-सत्तरी** या संस्थेच्या सौ. आसावरी कुलकर्णी यांनी लिहिलेले " **प्रजासत्ताक**" या नाटकाने होणार आहे.

स्पर्धेतील सर्व नाटयप्रयोग रोज सायं.७.०० वाजता रविंद्र भवन, साखळी येथे होणार असून रु.५०/-च्या प्रवेशिका रविंद्र भवन, साखळीच्या तिकिट काऊंटरवर उपलब्ध असतील याची नाटयरसिकांनी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळवले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसजी